# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

Email: rch.chandrapur@yahoo.com Ph. No. 07172-250220, 273856

क्रमांक : चंशमनपा/ आरोग्य विभाग / 310/2023 दिनांक 22/06/2023

## राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मनपा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी महानगरपालिका, चंद्रपूर मार्फत राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम या उपक्रमा अंतर्गत डासोत्पत्तीस्थाने तपासणीस (ब्रिडींग चेकर्स) पदे भरण्याबाबतची जाहीरात

चंद्रपुर शहर महानगरपालिका अधिनस्त आरोग्य विभागातील राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत एकूण 25 डासोत्पत्तीस्थाने तपासणीस (फक्त पुरुष) (ब्रिडींग चेकर्स) नेमण्यासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी व करारपध्दतीने 5 महिन्यांच्या कालावधी करीता मानधन तत्वावर खालील पदांकरीता विहीत अर्हता पात्र उमेदवारांची गुणांकन पध्दतीने पदभरती घेण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | आवश्यक पदे | मानधन प्रति दिवस रु. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | डासोत्पत्तीस्थाने तपासणीस (पुरुष) (ब्रिडींग चेकर्स) | किमान 10 वी पास | 18 से 45 वर्षे | 25 | 450/- |

पात्र उमेदवारांनी भरावयाचा अर्ज, शैक्षणिक अर्हता, अनुभव, अर्जाचा विहित नमूना व अर्ज करण्याची पध्यती इ. बाबतची सविस्तर माहिती https://www.cmcchandrapur.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

पात्र उमेदवारांनी त्यांनी त्यांचे स्वतःचे अर्ज **दि. 28/06/2023 रोजी सकाळी 10.00 से सायं. 5.00 वाजेपर्यंत** चंद्रपुर शहर महानगरपालिका, चंद्रपूर कार्यालयातील आरोग्य विभागात प्रमाणित दाखल्यांसह (अटेस्टेड करून) स्वतः जमा करणे अनिवार्य राहील. तसेच, अर्ज सादर करतेवेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे / दाखले सुध्दा पडताळणी करण्याकरीता सोबत ठेवणे अनिवार्य राहील. उमेदवारांनी Hard copy मध्ये सादर केलेले अर्जच विचारात घेतले जातील. ई-मेल किंवा तत्सम व्दारे सादर केलेले Soft Copy मधील अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

**पत्ता :** आरोग्य विभाग, 3 रा माळा, गांधी चौक, चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

स्वा/-

आयुक्त

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

MahaNMK.com